

माफसु

# यशोगाथा







# शेततळयातील मत्स्यशेती – शेतीस पुरक व्यवसाय

श्री. ओंकार मसकल्ले हे शेतकरी असुन त्यांचा वडीलोपार्जित शेती हा व्यवसाय असुन त्यामध्ये कुटुंबातील सर्वचजण सहकार्य करतात. सोयाबीन, तुर, मुग, उडीद, गहु व हरभरा इत्यादींचे ते पीक घेतात. ३० मी. X ३० मी. X ४ मी. आकाराचे शेततळे असून २०१५-१६ मध्ये त्यांनी मत्स्यशेतीचा व्यवसाय सुरू केला. २०१६ मध्ये दुष्काळी परिस्थितीतही मत्स्यसंवर्धन त्यांनी कमी पाण्यामध्ये केले. कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ किंवा बॅंकेचे कर्ज न घेता त्यांनी शेततळयात कटला, रोहू या जातीचे मत्स्यबीज संचयन केले. त्यापासुन त्यांनी रू २०,०००/- एवढा आर्थिक नफा मिळविला. जोडव्यवसाय म्हणुन त्यांनी पशु व दुग्धव्यवसाय ही सुरू केला. त्यामधुनही त्यांना रू २२,०००/- एवढा नफा मिळाला.

शासकीय मत्स्यबीज केंद्रातून मत्स्यबीज घेवून त्यांनी शेततळयात संचयन केले. मत्स्यपालनासाठी आवश्यक असलेली सामुग्री जसे खत व खाद्य यांचे व्यवस्थापन शास्त्रीय पध्दतीने करण्याचे ठरविले. हे सर्व उपयुक्त मार्गदर्शन उदगीर येथील मत्स्यविज्ञान महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापक वृंदाकडुन मिळत आहे. केंद्र शासनाच्या 'मिशन फिंगरलींग' या मत्स्यव्यवसाय विभाग, लातूर यांच्याकडे नांव नोंदणी केले आहे.

दुग्धव्यवसाय व मत्स्यशेती हा पुरक जोडव्यवसाय आहे. त्यासाठी मनुष्यबळ व साधनसामुग्री शेतामध्येच उपलब्ध असते. त्यामुळे दोन्ही व्यवसाय एकात्मीक पध्दतीने केल्यास हमखास उत्पन्नात वाढ होतेच असे ठाम मत ओंकार मसकल्ले यांनी व्यक्त केले.

मोठया आकाराचे शेततळे व मत्स्य तलाव तयार करून त्यामध्ये मत्स्यबीज संचयन व मत्स्यसंवर्धन करण्याचा भविष्यात त्यांचा इरादा आहे. मत्स्यविज्ञान महाविद्यालयामधील कार्यशाळेत देखील ते सहभागी झाले. या कार्यक्रमातून मत्स्यसंवर्धन आधुनिक पध्दतीने करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली असल्याचेही श्री मसकल्ले सांगतात.

श्री. ओंकार माणिकराव मसकल्ले
रा. महादेववाडी पो. दावणहिप्परगा
ता. देवणी जि. लातूर

मार्गदर्शक :
डॉ. ए. एस. कुलकर्णी, श्री. व्ही. बी. सुतार,
श्री. ए.टी. मरकड,
सहाय्यक प्राध्यापक,
मत्स्यविज्ञान महाविद्यालय, उदगीर